नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०७/२०२६ (सोमवार)**

---

# जबरी चोरीचा गुन्हा उघड
## आरोपी अटक, ०४ लाख ५१ हजार २०० रूपयाचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बोरी** :— पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत फिर्यादी नामे सुशांत चंद्रकांत हजारे, वय ५३ वर्ष, रा. चंद्रमनी नगर, भगवान नगर नागपूर यांनी तक्रार दिली की, दिनांक ०५/०७/२०२६ रोजी १७.३० वा. ते १७.४० वा. दरम्यान मौजा फुकेश्वर रेल्वे बोगदयाच्या जवळ यातील दोन अनोळखी व्यक्तींनी फिर्यादी व त्याचे परिवारास अडवून चाकुचा धाक दाखवुन दोन सोन्याची चैन, गोप प्रत्येकी दोन तोळयाची किंमती १,२०,०००/—रू आणि नगदी १०००/—रू असा एकुण १,२१,०००/—रू जबरदस्तीने हिसकावुन घेवुन गेले. फिर्यादीचे तोंडी रीपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे अपराध क्रमांक ६२२/२६ कलम ३०९(४), ३(५) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद आहे.

मा. श्री. हर्ष पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग — प्रभार उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात बुट्टीबोरी पोलीसांसह स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण हे सुद्धा सदर गुन्हयाचे समांतर तपास करीत होते. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास तपासा दरम्यान गोपनीय माहिती वरून तसेच सायबर पोलीस स्टेशन नागपुर ग्रामीण यांच्या कडुन प्राप्त तांत्रिक पुराव्यावरून मिळालेल्या माहितीचे आधारे सदर गुन्हयात **आरोपी क्र. १) रामेश्वर प्रल्हाद प्रधान, वय ३८ वर्षे, रा. धनगवळी नगर, भिमवाडी गेट खरबी ,बहादुरा रोड नागपूर विजय अलोणे याचे घरी भाडयाने आणि २) अफरोज उर्फे सलीम मोहम्मद जिआउद्दीन शेख (पठाण), वय ४८ वर्षे रा. शारदा नगर भिमवाडी खरबी, बहादुरा रोड नागपूर सत्तारभाई रहमत शेख याचे घरी भाडयाने यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले.** दिनांक १३/०७/२०२६ रोजी आरोपी क्र. १) **रामेश्वर प्रल्हाद प्रधान, वय ३८ वर्षे, रा. धनगवळी नगर, भिमवाडी गेट खरबी ,बहादुरा रोड नागपूर**

**विजय अलोणे याचे घरी भाडयाने याला** भिमवाडी गेट, बहादुरा रोड येथुन ताब्यात घेतले. सदर आरोपींकडे कौशल्य पूर्ण विचारपूस केली असता त्याने त्याचा साथीदार आरोपी २) **मोहम्मद अफरोज उर्फे सलीम मोहम्मद जिआउद्दीन शेख (पठाण) याचेसह** पोलीस स्टेशन बोरी परिसरात जबरी चोरीचा गुन्हा केल्याची माहिती दिली. दोन्ही आरोपी हे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. आरोपी क्रमांक २ यास यापूर्वी बलात्काराच्या गुन्ह्यात न्यायालयाने दोषी ठरवून शिक्षा सुनावली होती. सदर आरोपी हा अमरावती कारागृहात दाखल असून सध्या तो पॅरोल रजेवर नागपूर येथे आला असल्याची माहिती प्राप्त झाली. आरोपी क्रमांक २ याने पॅरोल रजेवर असताना त्याचा साथीदार आरोपी क्र. ०१ याचेसोबत संगनमत करून सदरचा गुन्हा केला असुन तसेच सदर गुन्ह्यात वापरण्यात आलेली दुचाकी ही सुद्धा चोरी केलेली असल्याची माहिती तपासात निष्पन्न झाली. आरोपी क्र. २) हा सध्या अमरावती जेल येथे दाखल असुन आरोपी क्र. ०१ याला आज रोजी दिनांक १३/०७/२०२६ रोजी अटक केली आहे.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) सोन्याचे दागिने किंमती ४,००,०००/— रूपये २) एक हिरो कंपनीची स्प्लेंडर प्लस मोटर सायकल नंबर प्लेट नसलेली किंमती ५०,०००/—रूपये ३) नगदी १०००/— रूपये ४) ०२ लोखंडी चाकू किंमती २००/—रूपये असा एकुण ४,५१,२००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

# १३५ ग्रॅम गांजा ०३ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त, आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक आणि कळमेश्वर पोलीसांची संयुक्त कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :—** दिनांक ११/०७/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक हे सावनेर उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने अंमली पदार्थ गांजा बाबत खात्रीशिर माहीती दिली की, मौजा उपरवाही येथे राहणारा इसम नौशाद शेख हा गांजा अंमली पदार्थ स्वत:जवळ बाळगून विक्री करीत आहे. नमुद पथकाने सदर माहीती मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री सागर खर्डे, उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग यांना देत त्यांच्या मार्गदर्शनात मिळालेल्या माहीतीच्या आधारे सापळा रचुन कळमेश्वर पोलीसांसह संयुक्त कारवाई करत मौजा उपरवाही येथे **आरोपी नामे नौशाद रशीद शेख, वय ३९ वर्ष, रा. वार्ड क्र. ०१, उपरवाही** हा त्याचे घराचे समोर उभे असलेल्या लोकांना कागदी पुडीमध्ये काहीतरी देताना दिसुन आला. पोलीसांचा संशय अधिक बळावल्याने आरोपीस ताब्यात घेतले. तो विकत असलेल्या पदार्थाबाबत विचारपुस केली असता अंमली पदार्थ गांजा विक्री करीत असल्याचे सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष त्याची अंगझडती तसेच आरोपीचे राहते घराची घरझडती घेतली असता अंमली पदार्थ गांजा मिळुन आला.

**नमुद आरोपीच्या ताब्यातुन अंमली पदार्थ गांजा वजन १३५ ग्रॅम किंमती ३,५००/—रुपये, एक पांढऱ्या रंगाचा गांजा वजन करण्याचा काटा किंमती ५२०/—रूपये, ०१ अॅन्डरॉईड मोबाईल किंमती ७,०००/—रूपये व रोख रक्कम २०००/—रूपये असा एकुण १३,०२०/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद प्रकरणी आरोपीविरूद्ध पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम ८(क), २० (ब) (ii) एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०७ गुन्हे नोंद

दिनांक १२/०७/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू असा एकुण ३०८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी नामे विश्वनाथ मदनकर, वय ६५ वर्ष, रा. रेवराल याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे ज्ञानेक्ष्वर त्रिंबक वडे, वय ६० वर्ष, रा. कुंभारी, ता. मौदा याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे मंगेश पुरुषोत्तम वाडबुधे, वय ३५ वर्ष, रा. मेंढला, ता. नरखेड याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे क्रिष्णा धनराज गुरमुळे, वय ४५ वर्ष, रा. वार्ड क्र १४, कुंभारपेठ नरखेड याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे १) शालीकराम नारायन वांगरूटे, वय ७० वर्ष, रा. टेंभुरडोह २) सुकराम दयाराम परतेती  वय ५० वर्ष रा. सालेघाट ३) मनोज सुखराम चंगरी, वय ३४ वर्ष, रा. सालेघाट यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण २८८० मिली देशी दारू, १८ लिटर मोहाफुल दारू असा एकुण ३०८०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने